महाराष्ट्र शासन

उच्च शिक्षण संचालनालय

# शिक्षण शुल्क समिती, मुंबई

(राज्यातील विना अनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षणशास्त्र व शारिरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालयांसाठी)

शासकीय अध्यापक महाविद्यालय, एलफिन्स्टन तांत्रिक विद्यालय आवार, पहिला मजला,

३ महापालिका मार्ग, धोबी तलाव, मुंबई - ४०० ००१

web:www.mahasss.in  दूरध्वनी :- (०२२) २०८२४४७८  Email :- jd.hesss-mh@gov.in

जा.क्र./शिशुस./कंत्राटी पदे /२०२६/ ६९७  दिनांक :- २६/०२/२०२६

## दरपत्रक सूचना

विषय - कंत्राटी लिपिक व कंत्राटी शिपाई यांच्या सेवा बाह्ययंत्रणेमार्फत घेणेबाबत.

शिक्षण शुल्क समिती, मुंबई या कार्यालयात कंत्राटी लिपिक -१ व कंत्राटी शिपाई-१ या पदांसाठी एक वर्षाच्या कंत्राट कालावधी करीता कंत्राटी तत्वावर सेवा पुरविण्यासाठी नोंदणीकृत अनुभवी ठेकेदार/कंपणी/संस्थेकडून दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

सदरची दरपत्रक सुचना, उच्च शिक्षण संचालनालयाच्या www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर तसेच या कार्यालयाच्या सुचना फलकावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पदनाम | पात्रता | कामाचे स्वरूप | पद संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | कंत्राटी लिपिक | पदविधर, MS-CIT, टायपींग -मराठी ३० शब्द प्रती मिनिट, इंग्रजी ४० शब्द प्रती मिनिट | कार्यालयीन पत्रव्यवहार, आवक - जावक नोंदी, शुल्क निश्चिती बैठकीच्या अनुषंगाने आवश्यक सर्व पुर्वतयारीची कामे करणे.<br>कार्यालय प्रमुखांनी वेळोवेळी सांगीतलेली कामे करणे, इत्यादी.. | १ |
| २ | कंत्राटी शिपाई | १२ वी पास | दैनंदिन स्वच्छता, अधिकारी/कर्मचारी यांच्या सुचनेनूसार धारीका हाताळणे, व इतर अनुषंगीक कामे. | १ |

कंत्राटदाराने सदर कामाचे दरपत्रक सादर करातांना लिफाफ्यावर कंत्राटी लिपिक व कंत्राटी शिपाई पदाकरिता दरपत्रक असे नमूद करावे. तांत्रिक बाबीचा लखोटा व आर्थिक दरपत्रक लखोटा असे दोन्ही स्वतंत्र सिलबंद लखोटे दि. २० मार्च २०२६ रोजी सायं. ०५ : ०० पर्यंत शिक्षण शुल्क समिती, मुंबई कार्यालयात सादर करावेत.

(द. आ. क्षीरसागर)

सहसंचालक,

शिक्षण शुल्क समिती, मुंबई

Scanned with OKEN Scanner

## भाग अ- तांत्रिक बाबींचा लखोटा -

१. दरपत्रक सादर करणे करिता अर्ज (सोबत नमुना)
२. कंत्राटी कर्मचारी यांची सेवा केंद्र/ राज्य शासन वा इतर अन्य आस्थापनांमध्ये पुरविली असल्यास त्याबाबतचे कार्यादेश. कामाच्या ३ वर्षाचा अनुभवाचे प्रमाणपत्र
३. कंपनीचे संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र
४. ई.पी.एफ. नोंदणी प्रमाणपत्र
५. आयकर विभागाने जारी केलेले पॅन कार्ड
६. वस्तू व सेवा कर नोंदणी प्रमाणपत्र
७. मागील तीन वर्षांचे आयकर भरल्याचे प्रमाणपत्र
८. ऐपतीचा दाखला
९. व्यवसाय चालविण्यासाठी नियमानुसार आवश्यक असणाऱ्या विविध नोंदण्या बाबतचे प्रमाणपत्र
१०. दरपत्रक सुचनेतील सर्व अटी व शर्थी मान्य असल्याचे प्रमाणपत्र

वर नमूद केलेली सर्व कागदपत्रे वर दिलेल्या क्रमानेच सादर करण्यात यावी. तसेच तांत्रिक बाबी लखोटा मध्ये उपरोक्त नमूद केलेल्या कागदपत्रांच्या छायांकीत साक्षांकित प्रती सादर करण्यात याव्यात, कंत्राटदाराने सदर प्रमाणपत्रे सादर न केल्यास दरपत्रक अर्ज बाद ठरविण्यात येईल.कागदपत्रांच्या पुर्ततेबाबत अटी शिथील करण्याचे अधिकार शिक्षण शुल्क समिती कार्यालयास राहतील.

Scanned with OKEN Scanner

## भाग ब – दरपत्रक लखोटा

कंत्राटदार/ठेकेदार/ कंपनी/संस्थेचे संपूर्ण नाव –

कंत्राटदार/ठेकेदार/ कंपनी/संस्थेचे संपूर्ण पत्ता –

कंत्राटदार/ठेकेदार/ कंपनी/संस्थेचा संपर्क दूरध्वनी-

कंत्राटदार/ठेकेदार/ कंपनी/संस्थेचा वस्तु व सेवा कर कम्रांक-

| अ.क्र. | कार्यालयाचे नाव | कंत्राटी पदाचे नाव व पदसंख्या | सेवा पुरविण्यासाठी कंत्राटदाराने मागणी केलेली रक्कम प्रतिमहिना/ प्रतिव्यक्ती | सेवा कर | करासहीत एकूण रक्कम प्रतिमहिना/ प्रतिव्यक्ती (४+५) |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | शिक्षण शुल्क समिती, मुंबई | कंत्राटी लिपिक १ | | | |
| २ | | कंत्राटी शिपाई १ | | | |

वरिल तक्त्यात अ.क्र. ४ ते ६ स्तंभातील माहिती कंत्राटदाराने भरावयाची आहे. **आर्थिक दरपत्रक कंत्राटदाराचे सही / शिक्क्यानिशी असावी.**

**ठिकाण :**

**दिनांक :**

**कंत्राटदाराची स्वाक्षरी**
**दिनांकासह / शिक्का**

Scanned with OKEN Scanner

# अर्जाचा नमुना

## शिक्षण शुल्क समिती, मुंबई कार्यालयातील कंत्राटी पदे बाह्ययंत्रणेव्दारे भरणेकरीता दरपत्रक देणेबाबतचा अर्ज

प्रति,
सहसंचालक,
शिक्षण शुल्क समिती, मुंबई

१.कंत्राटदार/ठेकेदार / कंपनी/ संस्थेचे नांव :

२. कंत्राटदाराचा पत्रव्यवहाराचा पत्ता :

३. कायमचा पत्ता :

४. दुरध्वनी क्रमांक :

५. ई-मेल आयडी :

६. महाराष्ट्र राज्याचे रहिवासी आहात का :

मी, श्री/ श्रीमती ____________________________ याव्दारे प्रतिज्ञापूर्वक असे जाहिर करतो/ करते की, मी आपल्या कार्यालयामार्फत दिनांक /०२/२०२६ रोजी प्रसिध्द झालेल्या दरपत्रक सुचनेनुसार कंत्राटी लिपिक व शिपाई ही पदे बाह्ययंत्रणेव्दारे भरणेबाबत अर्ज सादर करीत आहे. सदरहू अर्जासोबत तांत्रिक बाबी लखोटा नमूद अ.क्र. १ ते १० मधील सर्व सांक्षांकीत दस्तऐवज सादर करीत आहे.

ठिकाण :
दिनांक :

कंत्राटदाराची स्वाक्षरी
दिनांकासह / शिक्का

Scanned with OKEN Scanner

# बाह्ययंत्रणेमार्फत मनुष्यबळ पुरविणाऱ्या संस्थासाठी अटी व शर्ती

१) पात्र कंत्राटदारास कामाचे आदेश देण्यापुर्वी कंत्राटदाराने रुपये ५००/- चे मुद्रांक पेपरवर करारनामा करुन दणे आवश्यक राहील.

२) करारनामा केल्यानंतर कंत्राटदाराने दिलेल्या विहित मुदतीत आवश्यकतेप्रमाणे मनुष्यबळ पुरवठा न केल्यास विहित नियमानुसार विलंब आकार/दंड आकारला जाईल.

३) कंत्राटदाराकडून/पुरवठादाराकडून करारनाम्यातील कोणत्याही अटीचे उल्लंघन झाल्यास कामाचे आदेश रद्द करण्यात येतील व त्याला कोणतीही रक्कम प्रदेय राहणार नाही.

४) शिक्षण शुल्क समिती, मुंबई यांना कोणत्याही वेळी कारण न दर्शविता कंत्राटदारास १ महिन्याची आगाऊ, नोटीस देवून करारनामा रद्द करण्याचा/संपुष्टात आणण्याचा अधिकार असेल.

५) कंत्राटदाराने किमान वेतन कायद्यातील तरतुदींचा भंग होणार नाही याची दक्षता घ्यावी. या कायद्याचा भंग झाल्यास व त्यातून काही समस्या उद्भवल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदार कंपनीची राहील याची नोंद घ्यावी.

६)कंत्राटदाराने कंत्राटी कामगाराला देय असलेले वेतन बँकेमार्फत आदा करून त्याचा तपशिल दरमहा या कार्यालयास देणे बंधनकारक राहील. जोपर्यंत कंत्राटदार वेतनाचा तपशिल सादर करणार नाही, तोपर्यंत त्या महिन्याचे कंत्राटदाराचे देयक अदा करण्यात येणार नाही.

७) कंत्राटाचा कालावधी कोणत्याही परिस्थितीत एक वर्षापेक्षा जास्त राहणार नाही.

८) सदरील कंत्राटदार निवड प्रक्रीयेस शासनाकडून प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळाल्यानंतर ती अंमलात येईल.

९) कंत्राटदारामार्फत दिल्या जाणाऱ्या वरील सेवा/सुविधा इत्यादीबाबतच्या कार्यपध्दतीचा व कामाचा आढावा कार्यालयामार्फत वेळोवेळी घेण्यात येईल व वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक राहील.

१०) उपरोक्त कामासाठी कंत्राटदारामार्फत ज्या कंत्राटी कर्मचाऱ्यास काम देण्यात येणार आहे, त्यांना नियमित कर्मचाऱ्यांप्रमाणे " नियम व अटी व शर्ती" लागू राहणार नाहीत. तसेच त्यांना नियमित कर्मचाऱ्यांप्रमाणे कोणतेही वेतन व भत्ते तथा अनुषंगिक लाभ अनुज्ञेय / लागू राहणार नाही. त्यांचा सेवा कालावधी किंवा कर्तव्य कालावधी व मानधनाबाबत हे कार्यालय कसल्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही.

११) कंत्राटदाराने कंत्राटी कामगार पुरविताना बाल कामगारांचा समावेश होणार नाही, याची दक्षता घ्यावी.

१२) कंत्राटदारास कंत्राटी कामाचा मोबदला अदा करताना त्यातून नियमाप्रमाणे आयकर कापून घेण्यात येईल.

१३) कंत्राटदारामार्फत नेमलेल्या कंत्राटी कामगारांकडून सरकारी मालमत्तेचे नुकसान झाल्याचे निदर्शनास आल्यास, नुकसान भरपाईची रक्कम कंत्राटदार यांना देय असलेल्या रक्कमेतून वसूल करणेत येईल,

Scanned with OKEN Scanner

१४) केवळ दरपत्रक पाठविले म्हणून कंत्राटावर हक्क सांगता येणार नाही.

१५) कंत्राटदारास कंत्राटाचे संबंधात कोणत्याही प्रकारची आगाऊ रक्कम दिली जाणार नाही.

१६) कंत्राटदारास पूर्वीचे कामाचा अनुभव असल्यास त्याने दरपत्रकासोबत अनुभवाचे प्रमाणपत्र हजर करणे आवश्यक राहील.

१७) कंत्राटदाराने नियुक्त कामगारांना सामाजिक सुरक्षेतंर्गत फायदे, तसेच. पी. एफ. आणि एम. पी. ॲक्ट, १९५२ अंतर्गत असलेले फायदे देणे बंधनकारक राहील.

१८) कंत्राटदारास अस्तित्वात असलेल्या अनुषंगिक सर्व कायद्याचे नियमांचे पालन करणे बंधनकारक राहील.

१९) सदरील कर्मचा-यांना अपघात झाल्यास खर्चाची पूर्तता करण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील. कर्मचाऱ्यांकडून कार्यालयास / इतरांस नुकसान झाल्यास खर्चाची पूर्तता करण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

२०) व्यसनाधीन, गुन्हेगारी पार्श्वभूमी असणाऱ्या कंत्राटी कर्मचा-यास नियुक्ती देता येणार नाही. कर्मचारी नियुक्ती पूर्वी अशा कर्मचा-यांची चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र तसेच महाराष्ट्राचा अधिवासी असल्याचे प्रमाणपत्र घेणे कंत्राटदारावर बंधनकारक राहील. सदर उमेदवारांचे दोन्ही प्रमाणपत्रे नियुक्ती वेळी कार्यालयास सादर करावे.

२१) कंत्राटी कामगांराचे नैसर्गिक आपत्ती, अपघात, इजा/जखम इतर अनुचित घटना इत्यादी कारणास्तव कोणतेही नुकसान झाल्यास खर्चाची पूर्तता (नुकसान भरपाई) करण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

२२) कंत्राटी कर्मचाऱ्याकडून कार्यालयास / इतरांस नुकसान झाल्यास खर्चाची पूर्तता करण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

२३) करार कालावधीत, उमेदवाराची सचोटी संशयास्पद आढळून आल्यास अथवा कामकाजामध्ये निष्काळजीपणा दाखविल्यास अथवा करारातील अटी व शर्तीचा भंग केल्यास सदर करारनामा संपुष्टात येईल व कंत्राटी कर्मचाऱ्यास कोणतीही पूर्वसूचना न देता काढून टाकण्यात येईल.

२४) भविष्यात शासनाच्या धोरणामध्ये बदल झाल्यास, त्यानुसार याप्रकरणी कार्यवाही करण्यात येईल.

२५) कंत्राटदारास दरमहा कंत्राटीची रक्कम मागणी करण्यासाठी तीन प्रतीत देयक सादर करावे. सदर बाबत आस्थापना शाखेने प्रमाणित केल्यानंतर देयकाचे प्रदान करण्यात येईल. कार्यालयास अनुदान प्राप्त न झाल्यास किंवा इतर शासकीय कारणाने अपवादात्मक परिस्थितीत देयक प्रदान करण्यास चार /पाच महिने इतका कालावधी प्रलंबित राहण्याची शक्यता असल्यास अशावेळी ठेकेदाराने त्यांच्या कामगारांना वेतन वेळेवर देणे बंधनकारक राहील.

२६) कायम स्वरुपी शासकीय नोकरीसाठी कार्यालयाकडे/शासनाकडे/ न्यायालयाकडे दावा अथवा खटला करणार नाही अशा आशयाचे हमीपत्र संबंधीत कंत्राटी कर्मचाऱ्यांकडून घेऊन या कार्यालयास सादर करणे कंत्राटदारास बंधनकारक राहील.

सहसंचालक
शिक्षण शुल्क समिती, मुंबई

Scanned with OKEN Scanner